# स्पर्धा क्र. 1 “कथा पूर्ति”

**<u>खालील गोष्ट पूर्ण करा</u>**

**काल एक बातमी वाचून जीव कासावीस झाला. या बातमीमुळे दिवसभर मी अस्वस्थ होते. ती माझ्या दूरदूरपर्यंत ओळखीची नाही. ती गोरी का काळी? मला काही माहित नाही.**

**बातमी होती,...**

**काही दिवसांपूर्वी तूफान मुसळधार पावसामध्ये मुंबईत एक दहा मजली इमारत कोसळली. तेथील दगड-विटांचा ढिगारा काढतांना एका मजूराला पाचव्या दिवशी कण्हण्याचा आवाज आला. त्यानंतर अत्यंत काळजीपूर्वक कामाची गति वाढवली आणि एक जखमी तरूण मुलगी त्या ढिगातून बाहेर काढली. एम्ब्युलेंस तयार होतीच;**

**त्या मुलीला दवाखान्यात भर्ती करण्यात आले. चौकशी नंतर कळले की,**

**तिचे नाव देविका जोशी,**

**वय वर्ष 27,**

**एका MNC मधे नोकरी करणारी,**

**लग्न ठरलेल व येत्या डिसेंबर मध्ये होणार आहे.**

**दवाखान्यात नेल्यावर कळले की तिचे दोन्ही पाय अधू झाले आहेत. कमीत कमी वर्ष भर तरी दवाखान्यातच रहावे लागेल. हळुहळु बाकी शरीरांतर्गत जखमा कळण्याची शक्यता पण नाकारता येत नाही.**

**देविकेच्या जागी स्वतःला ठेवून मी विचार करू लागले तर ....**

**(गोष्ट पूर्ण करा)**

**<u>स्पर्धेसाठी नियम</u> :**

1. **स्पर्धकाला फक्त एकदा मंडळाच्या वेबसाईट वरून ऑनलाईन किंवा मंडळाच्या जबलपुर येथील कार्यालयात रोख रु 500/- नोंदणी फी जमा करून स्वत:ची नांव नोंदणी करणे आवश्यक आहे**. मग त्या स्पर्धकाच्या कुटुंबातील सर्व सदस्य स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकतील.परन्तु एका वेळी एकच सदस्य एका स्पर्धेत भाग घेऊ शकेल.परंतु जर जोडीदार किवा इतर कोणीही कुतुम्बीय देखील मंडळाच्या शाळांपैकी कोठल्याही शाळेत शिकला/शिकली असेल, तर त्यांना देखील नोंदणी फी भरावी लागेल.
2. जबलपूर केंद्रातील सर्व स्पर्धा महाराष्ट्र कॉलेज/महाराष्ट्र हायस्कूल/महाकोशल हायस्कूल जबलपुर मध्ये होतील. ईतर शहरांमध्ये त्या शहरातील केंद्राची समिती योग्य ठिकाण निवडून स्पर्धा आयोजित करेल.
3. स्पर्धा आयोजित करण्यासाठी शिक्षण मंडळ योग्य प्रमाणात आर्थिक मदत पुरवील.
4. स्पर्धेत विजयी प्रथम दोन विजेत्यांची नांवे आणि त्यांचे पासपोर्ट आकाराचे फोटो मंडळाच्या जबलपूर कार्यालयात पाठवले जातील. त्या विजेत्यांना 27 ते 29 डिसेंबर 2025 ला जबलपुरात आयोजित केल्या जाणाऱ्या भव्य मेळाव्यात बक्षिसे दिली जातील, त्यांची कला मंचावरून सादर

करण्याची संधी दिली जाईल आणि त्यावेळी प्रकाशित होणाऱ्या स्मारिकेत त्यांची नांवे प्रकाशित केली जातील.

5. केंद्रातील स्थानीय समिति प्रमुख देखील स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकतील, परन्तु परीक्षक भाग घेऊ शकणार नाहीत.
6. सर्व स्पर्धांचे आयोजन आणि विजेत्यांच्या निर्णयाबद्दल सर्व हक्क महाराष्ट्र शिक्षण मंडळ जबलपुरच्या स्वाधीन राहतील.
7. हया स्पर्धेत स्पर्धकाला दिलेल्या अपूर्ण कथेला आपल्या कल्पनेप्रमाणे जास्तीत जास्त पाचशे शब्दांतच (वर दिलेल्या अपूर्ण कथेतील शब्द संख्या सोडून) पूर्ण करायचे आहे.
8. पाने ए-4 साइज़ पेपर मध्ये टाईप करून पाठवावी.
9. गोष्टीला योग्य शीर्षक द्यावे.
10. कथा पूर्ण झालेल्या पानावर सर्वात खाली आपले नाव व मोबाइल नं. लिहावा.
11. स्पर्धे साठी आवश्यक तो प्रवेश फॉर्म कथे सोबत संलग्न करुन पाठवावा .
12. कथा पूर्ण करून जबलपुरला मंडळाच्या ऑफिस मध्ये स्पीड पोस्ट ने खालील पत्त्यावर दिनांक 25 July 25 पर्यंत पाठवावी.

महाराष्ट्र शिक्षण मंडळ, गोल बाज़ार, राइट टाउन, जबलपुर 482002,

किवा ईमेल -msmjbp@gmail.com

**<u>स्पर्धा संयोजक</u>**

श्री. अनिल राजुरकर- 8108861561

श्रीमती वर्षा भावे - 9301976696